# शुल्क नियामक प्राधिकरण

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था
(प्रवेश व शुल्क यांचे विनियमन)
"शिक्षण-नव्हे व्यवसाय-ज्ञान यज्ञ"

३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत,
४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१ (महाराष्ट्र राज्य) भारत.

**ई-मेल :** fra.govmh@gmail.com
**संकेतस्थळ :** www.mahafra.org
**संपर्क :** ०२२-३१९८०३४८ / ८८२८७ ८६२६४


क्रमांक: शुनिप्रा/सूचना/ १२५३/२०२५

दिनांक : २६/०९/२०२५

## सूचना

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये शुल्क नियामक प्राधिकरणाकडून निश्चित करण्यात आलेले शुल्क संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत.**

महाराष्ट्र राज्यातील वैद्यकीय / उच्च व तंत्र शिक्षण /कृषी या विभागांतर्गत येणाऱ्या व प्राधिकरणाच्या कक्षेत येणाऱ्या विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांना या सूचनेद्वारे असे निदर्शनास आणून देण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षामध्ये महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील कलम १४(४) नूसार खालीलप्रमाणे तरतूद आहे-

" प्रत्येक विनाअनुदानित संस्था, नियामक प्राधिकरणाने मान्यता दिलेले पाठयक्रमनिहाय शुल्क आपल्या सूचना फलकावर आणि आपल्या संकेतस्थळावर मराठी व इंग्रजीमध्ये प्रदर्शित करील. परंतु भाषिक अल्पसंख्याक संस्थांच्या बाबतीत, अशी संस्था ज्या अल्पसंख्याक भाषेशी संबंधित असेल त्या अल्पसंख्यांक भाषेतही ते शुल्क प्रदर्शित करील आणि ते विद्यार्थी व संस्था यांच्यावर बंधनकारक असेल."

त्यानुसार संबंधीत संस्थांना सूचित करण्यात येते की त्यांनी त्यांच्या संस्थेच्या संकेतस्थळाच्या मुख पृष्ठावर **"FRA- Fee Structure"** या नावाने स्वतंत्र टॅब तयार करुन त्यामध्ये खालीलप्रमाणे दिलेल्या तक्त्याप्रमाणे शुल्क प्रसिध्द करावे.

**Academic Year 2025-26**

| Sr. No. | Description | Fees | Total Fees |
|---|---|---|---|
| 1 | Tuition fee | | |
| 2 | Development Fee | | |
| *3 | Management Seat Fees | | |
| *4 | NRI Seat Fees | | |
| *5 | Against NRI Seat Fees | | |
| 6 | Caution Money / Deposit | | |

Fees Regulating Authority ★ Maharashtra State ★

* याबाबत स्वतंत्र सूचना दि. ३१/०७/२०२५ रोजी प्रसिध्द केली असून प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.(www.mahafra.org - Circular)

सदर शुल्काबाबतची माहिती आपल्या संकेतस्थळावर देण्यात आली आहे किंवा नाही याबाबत शुल्क नियामक प्राधिकरण कार्यालयाकडून वेळोवेळी तपासणी करण्यात येईल.

तरी संबंधित संस्थांनी वरील नमूद तरतूदींचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. एखाद्या महाविद्यालयाने सदर शुल्काची माहिती नियमानुसार संकेतस्थळावर प्रसिध्द केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा याबाबतची तक्रार विद्यार्थी/पालक यांच्याकडून प्राधिकरण कार्यालयास प्राप्त झाल्यास व तथ्य आढळल्यास अधिनियम २०१५ मधील कलम २० नुसार कार्यवाही करण्यात येईल.

डॉ. अर्जुन चिखले भा.प्र.से.
सदस्य सचिव
शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई